


# पारनेर दर्शन




वर्ष ४ अंक ३८, शुक्रवार २७ मार्च २०२६ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# ‘आयुष’ साठी खासदार नीलेश लंके मैदानात !

आयुष क्षेत्र बळकटीसाठी संसदेत ठाम आवाज | ग्रामीण भागाच्या प्रश्नांवर केंद्राचे लक्ष वेधले | खासदार लंके यांची समितीत प्रभावी व सखोल मांडणी | केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडून योजनांची माहिती | आयुष क्षेत्राच्या व्यापक विस्ताराचा मुद्दा केंद्रस्थानी



नवी दिल्ली : प्रतिनिधी

देशातील आरोग्य व्यवस्थेत आयुष पद्धतींचे स्थान अधिक भक्कम करण्यासाठी खासदार नीलेश यांनी संसदेत ठाम भूमिका घेतली असून, आयुष मंत्रालयाच्या सल्लागार समितीच्या बैठकीत त्यांनी प्रभावी व सखोल मांडणी केली. या बैठकीत आयुर्वेद, योग, युनानी, सिद्ध आणि होमिओपॅथी या उपचार पद्धतींचा देशभर अधिक विस्तार कसा साधता येईल, यावर विविध स्तरांवर चर्चा करण्यात आली. विशेषतः आधुनिक आरोग्य व्यवस्थेसोबत आयुष पद्धतींचे समन्वय साधण्याची गरज अधोरेखित करण्यात आली.

### ग्रामीण व दुर्गम भागांवर लक्ष

बैठकीत ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांना आयुष उपचार सहज उपलब्ध व्हावेत, यावर खासदार लंके यांनी विशेष भर दिला. अनेक ठिकाणी आयुष सुविधा अपुऱ्या असल्याने नागरिकांना या उपचारांचा लाभ मिळत नसल्याची बाब त्यांनी निदर्शनास आणून दिली. तसेच, प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये आयुष वैद्यकीय सेवा अधिक सक्षम करण्यासाठी मनुष्यबळ, औषधसाठा आणि आवश्यक पायाभूत सुविधा वाढवण्याची मागणीही त्यांनी केली.

### जनतेच्या अपेक्षा आणि अडचणींची मांडणी

खासदार लंके यांनी आपल्या मतदारसंघासह राज्यातील विविध भागांतील नागरिकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारी आणि अपेक्षा समितीसमोर मांडल्या. आयुष उपचार पद्धतींबाबत जनजागृतीचा अभाव, प्रशिक्षित वैद्यकीय तज्ज्ञांची कमतरता, तसेच योजनांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत न पोहोचणे या मुद्द्यांकडे त्यांनी लक्ष वेधले. याशिवाय, आयुष क्षेत्रात संशोधन आणि नवोन्मेषाला अधिक चालना देण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली.

### केंद्राच्या योजनांवर मंत्री जाधव यांची माहिती

खासदार लंके यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर देताना केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी मंत्रालयाच्या विविध योजनांचा आढावा सादर केला. देशभरात आयुष रुग्णालये, वेलनेस सेंटर्स, तसेच आयुष्मान भारत योजनेअंतर्गत आयुष सेवांचा समावेश वाढवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यासोबतच डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे आयुष सेवांचा प्रसार, संशोधन प्रकल्पांना निधी, तसेच वैद्यकीय शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी घेतल्या जाणाऱ्या उपाययोजनांची माहितीही त्यांनी दिली.

### ‘देशाच्या आरोग्य व्यवस्थेला नवे बळ’

आयुष क्षेत्र अधिक सक्षम झाले, तर देशाच्या आरोग्य व्यवस्थेला मोठी ताकद मिळेल, असा ठाम विश्वास खासदार लंके यांनी व्यक्त केला. संसदेत आणि विविध समित्यांमध्ये जनतेच्या आरोग्याशी संबंधित मुद्दे प्रभावीपणे मांडणे ही लोकप्रतिनिधी म्हणून आपली जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### आयुष आणि आधुनिक वैद्यक यांचा समन्वय हवा

आरोग्य क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी आयुष आणि आधुनिक वैद्यक यांचा समन्वय साधणे अत्यावश्यक असल्याचे मत या बैठकीत व्यक्त झाले. रोगप्रतिबंधक उपाय, जीवनशैलीतील सुधारणा आणि दीर्घकालीन आजारांवर प्रभावी उपचार यामध्ये आयुष पद्धतींचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. खासदार लंके यांनीही या समन्वयाला पाठिंबा दर्शवत, आरोग्य व्यवस्थेला सर्वसमावेशक बनवण्याची गरज व्यक्त केली.

### जनतेच्या पाठिंब्यामुळे दिल्लीत आवाज बुलंद

आपल्या मतदारसंघातील जनतेच्या पाठिंबा आणि विश्वासामुळेच त्यांच्या समस्या थेट केंद्र सरकारपर्यंत पोहोचवणे शक्य होत असल्याचे नमूद करत, भविष्यातही जनहिताच्या मुद्द्यांवर सातत्याने काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. आरोग्य क्षेत्रात सकारात्मक बदल घडवण्यासाठी आणि आयुष सेवांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी पुढील काळातही सक्रिय भूमिका बजावणार असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

# “योजना जनतेपर्यंत पोहोचल्या पाहिजेत”

आ. काशिनाथ दाते यांचे प्रतिपादन | महसूल समाधान शिबिरास नागरिकांचा प्रतिसाद | अनेक समस्या जागेवरच निकाली

कान्हुर पठार : प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत आयोजित “छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर” कान्हुर पठारसह तालुक्यात उत्साहात पार पडले. विविध विभागांच्या एकत्रित सहभागामुळे या शिबिराला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. शेकडो नागरिकांनी उपस्थित राहून शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेतला.



### समस्या ऐकून तत्काळ निर्देश

या शिबिराला आमदार काशिनाथ दाते यांनी भेट देत नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकल्या. अनेक तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. प्रशासनाने अधिक लोकाभिमुख होऊन काम करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

### “गावपातळीवरच प्रश्न सुटले पाहिजेत”

आ. दाते म्हणाले, “शासनाच्या योजना व सेवा कागदावर न राहता थेट जनतेपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. गावपातळीवर अशा शिबिरांद्वारे नागरिकांच्या अडचणी जागेवरच सोडवणे, हेच प्रशासनाचे खरे यश आहे.” महसूल, कृषी, आरोग्य, शिक्षण, परिवहन, सहकार अशा विविध विभागांनी एकत्रितपणे नागरिकांना दिलासा देण्याचा हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले.

### सर्वसामान्यांना मोठा दिलासा

“शेतकरी, महिला, विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या तात्काळ मार्गी लावण्यासाठी अशा शिबिरांची गरज आहे. शासन जनतेच्या सेवेसाठी कटिबद्ध असून प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत योजना पोहोचवण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करावे,” असेही आ. दाते यांनी स्पष्ट केले. अशा उपक्रमांमुळे नागरिकांच्या अडचणी जागेवरच सुटत असल्याने मोठा दिलासा मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

### विविध विभागांचा सहभाग

या शिबिरात भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, तहसीलदार गायत्री सौंदाने, तालुका कृषी अधिकारी गजानन घुले, तसेच विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी उपस्थित होते. सेतू केंद्र, संजय गांधी योजना शाखा, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, वनविभाग, सामाजिक वनीकरण, बचत गट, भूमिअभिलेख, आरोग्य, शिक्षण, सहकार आदी विभागांनी नागरिकांना मार्गदर्शन व सेवा पुरवली.

### प्रश्न जागेवरच निकाली

शिबिरादरम्यान अनेक नागरिकांच्या तक्रारींचे तत्काळ निराकरण करण्यात आले. तालुक्यातील इतर मंडलांमध्येही अशा शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असून नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले. शासनाच्या योजना प्रत्यक्षात उतरवून जनतेच्या समाधानातच या उपक्रमाचे यश दडलेले असल्याचे या शिबिरातून अधोरेखित झाले.

# भोंदू खरातचे व्हिडिओ व्हायरल करणे पडले महागात

तिघांवर गुन्हा दाखल | पोलिसांचा ग्रुप ॲडमिन आणि नेटकऱ्यांना कडक इशारा

अहिल्यानगर : प्रतिनिधी

नाशिकचा कथित ज्योतिषी आणि भोंदूबाबा अशोक खरात याच्या लैंगिक शोषणाचे अश्लील व्हिडिओ समाजमाध्यमांवर वाऱ्यासारखे पसरल्यानंतर आता पोलिस प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. तांत्रिक विधीच्या नावाखाली विवाहित महिला आणि तरुणींचे शोषण करणाऱ्या खरातच्या या कृत्यांचे व्हिडिओ



व्हायरल करून पीडितांची ओळख उघड केल्याप्रकरणी पोलिसांनी पहिला गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी कोपरगाव आणि बीडमधील तीन संशयितांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला असून, त्यांच्या अटकेसाठी पोलिसांची पथके रवाना झाली आहेत.

अशोक खरातच्या अश्लील चित्रफिती व्हायरल झाल्याने पीडित महिला आणि त्यांच्या उर्वरीत पान ३ वर

### व्हिडिओ शेअर करणाऱ्यांची साखळी

पोलिस तपासात या व्हिडिओ व्हायरल करण्याची एक साखळीच उघडकीस आली आहे. बीड जिल्ह्यातील माजलगाव येथील संदीप गरजे याने हे व्हिडिओ योगेश आढावला पाठवले होते, तर योगेशने ते कोपरगावच्या राहूल शिंदेला दिले. या साखळीचा तपास करत पोलिस आता या व्हिडिओचा उगम नेमका कोठून झाला आणि ते समाजमाध्यमांवर सर्वप्रथम कोणी आणले, याचा शोध घेत आहेत.

### नेटीझन्स आणि ग्रुप ॲडमिनना कडक इशारा

हा गुन्हा दाखल केल्यानंतर पोलिस प्रशासनाने जनतेला आणि विशेषतः व्हॉट्सॲप ग्रुप ॲडमिनना गंभीर इशारा दिला आहे. “कोणाकडेही पीडित महिला, तिचे नातेवाईक किंवा तिच्या घराची ओळख उघड होईल असे व्हिडिओ असल्यास ते तातडीने डिलीट करावेत. असे व्हिडिओ कोणत्याही सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर प्रसारीत करणे हा अजामीनपात्र गुन्हा ठरू शकतो. अशा पोस्ट फॉरवर्ड झाल्यास केवळ संबंधित व्यक्तीच नव्हे, तर ग्रुप ॲडमिनवरही कायदेशीर कारवाई करून त्यांना अटक केली जाईल,” असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

### गुन्ह्याचे स्वरूप आणि गांभीर्य

अशोक खरातने अघोरी पूजेच्या नावाखाली अनेक महिलांचे आयुष्य उद्ध्वस्त केल्याचे या व्हिडिओतून समोर आले आहे. मात्र, त्याचे गुन्हे उघड करण्याच्या नादात पीडित महिलांचे चारित्र्यहनन होणार नाही, याची काळजी घेणे ही समाजाची आणि प्रशासनाची जबाबदारी आहे. याच हेतूने पोलिसांनी आता तांत्रिक तपासाच्या आधारे अशा व्हिडिओंच्या प्रसारावर बंदी घालण्यासाठी पावले उचलली आहेत.

# भरधाव वाहनाच्या धडकेत मोपेडस्वाराचा मृत्यू

झुलेलाल मंदिरासमोर भीषण अपघात

अहिल्यानगर : प्रतिनिधी

नगर शहरातील तारकपूर परिसरात बुधवारी (दि. २५) रात्री आठच्या सुमारास भीषण अपघात घडून एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला. झुलेलाल मंदिरासमोर डीएसपी चौक ते पत्रकार चौक या मार्गावर भरधाव वाहनाने दिलेल्या धडकेत हा अपघात झाला. शिवाजी चंदर तोरडे (वय ४६, रा. लालटाकी, अहिल्यानगर) असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तोरडे हे




त्यांच्या मोपेडवरून डीएसपी चौकाकडून पत्रकार चौकाकडे जात होते. तारकपूर बसस्थानकाजवळील झुलेलाल मंदिरासमोर आले असता, एका भरधाव वेगातील वाहनाने त्यांच्या मोपेडला जोरदार धडक दिली. या धडकेत ते गंभीर जखमी झाले.

अपघातानंतर उर्वरीत पान ३ वर

# सुमन काळे मृत्यू प्रकरणाला नवे वळण?

एसआयटीद्वारे फेरतपासाची मागणी विधानसभेत घुमली

अहिल्यानगर : प्रतिनिधी

जिल्ह्यातील पारधी समाजातील समाजसेविका सुमन काळे यांच्या पोलीस कोठडीतील मृत्यू प्रकरणाला पुन्हा एकदा राजकीय व सामाजिक स्तरावरून उचल मिळाली असून या प्रकरणाचा तपास विशेष तपास पथकाकडे (एसआयटी) सोपवून फेरतपास करावा, अशी जोरदार मागणी विधानसभेत करण्यात आली आहे. आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी २५ मार्च रोजी लक्षवेधीद्वारे हा मुद्दा उपस्थित करत राज्य सरकारचे लक्ष वेधले.

सुमन काळे यांचा १२ मे २००७ रोजी पोलीस




कोठडीत मारहाणीत मृत्यू झाला होता. या घटनेनंतर तपास सीआयडीकडे सोपवण्यात आला; मात्र अनेक वर्षे उलटूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने संशय व्यक्त केला जात आहे. न्याय उर्वरीत पान ३ वर

# थरारक सरावाने नगर हादरले!

जिल्हाधिकारी कार्यालयात पोलीस दलाची दमदार ‘मॉकड्रिल’

अहिल्यानगर : प्रतिनिधी

नगर शहरातील जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात बुधवारी संध्याकाळच्या सुमारास अचानक पोलिसांचा मोठा ताफा दाखल झाल्याने काही काळासाठी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. सायरन वाजवत वेगाने धावणाऱ्या गाड्या, बंदुकधारी पोलीस आणि सुरू झालेली हालचाल पाहून परिसरात तणाव पसरला होता.



घटनेची कोणतीही पूर्वकल्पना नसल्याने नागरिकांमध्ये सुरुवातीला संभ्रम आणि घबराट निर्माण झाली. काहींनी याला प्रत्यक्ष दहशतवादी हल्ल्याची शक्यता मानत सुरक्षित ठिकाणी धाव घेतली. मात्र, प्रशासनाने तात्काळ स्पष्ट केल्यावर परिस्थिती नियंत्रणात आली.
ही कोणतीही वास्तविक आपत्ती नसून, पोलीस दलाने राबवलेली एक नियोजित ‘मॉकड्रिल’ (सराव मोहीम) असल्याचे स्पष्ट करण्यात आले.या मोहिमेचा मुख्य उद्देश होता की आपत्कालीन परिस्थितीत पोलिसांचा प्रतिसाद वेळ तपासणे, विविध विभागांमधील समन्वयाची चाचणी घेणे नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक यंत्रणा अधिक सक्षम करणे
या सरावादरम्यान संपूर्ण जिल्हाधिकारी कार्यालय परिसराची काटेकोर नाकेबंदी करण्यात आली होती. ‘दहशतवादी’ म्हणून भूमिका करणाऱ्या डमी व्यक्तींना पकडण्याची कारवाई पोलिसांनी अत्यंत चपळाईने पार पाडली. या संपूर्ण प्रक्रियेत शिस्तबद्ध आणि जलद हालचालींचे प्रदर्शन करण्यात आले.

या विशेष मोहिमेत स्थानिक पोलीस प्रशासन दहशतवाद विरोधी पथक, सुरक्षा रक्षक यांचा उर्वरीत पान ३ वर

# ‘वराळ हत्याकांड’ प्रकरणात प्रशांत वराळला जामीन

विशेष न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय | कठोर अटींसह जामीन मंजूर

अहिल्यानगर : प्रतिनिधी

अहिल्यानगर येथील विशेष न्यायालयाने ‘संदीप वराळ हत्याकांड’ प्रकरणात आरोपी क्रमांक २ प्रशांत ज्ञानदेव वराळ याचा नियमित जामीन अर्ज मंजूर केला आहे. विशेष प्रकरण क्रमांक ५६९/२०२० अंतर्गत हा आदेश २४ मार्च २०२६ रोजी मा.विशेष न्यायाधीश ए. एम. पाटील यांनी दिला.

न्यायालयाने समतोल तत्त्वाचा आधार घेत, याच प्रकरणातील इतर सहआरोपींना मिळालेल्या जामिनाचा विचार करून वराळ यालाही जामीन देण्याचा निर्णय घेतला.



### हत्याकांडाचा थरारक घटनाक्रम

२१ जानेवारी २०१७ रोजी पारनेर पोलीस ठाण्यात नोंद झालेल्या गुन्ह्यानुसार, निघोज ग्रामपंचायत चौकात मयत संदीप वराळ व फिर्यादी रंगनाथ वराळ यांची भेट झाली होती. काही वेळानंतर गोडाऊनकडे जात असताना अचानक गोळीबाराचा आवाज आला. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, आरोपींनी तलवार, कोयता आणि दगडांनी हल्ला करत पीडितावर गोळीबार केला. परिसरात दहशत निर्माण करण्यासाठी हवेतही गोळीबार करण्यात आल्याचे आरोप आहेत. पूर्वीच्या वैमनस्यातून कट रचून ही हत्या करण्यात आल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

### ॲड. परिमल फळे यांनी केलेला युक्तीवाद

आरोपीचे वकिल ॲड. परिमल फळे न्यायालयात युक्तिवाद करताना सांगितले की, प्रशांत वराळ याचा या गुन्ह्यात कोणताही सहभाग नाही. तो घटनास्थळी उपस्थित नव्हता, तसेच प्रशांत वराळ याच्या विरुद्ध कुठलेही ठोस पुरावे नसताना त्याला या गुन्ह्यात गोवलेले आहें. प्रशांत वराळ विरुद्ध केलेली मोका अंतर्गत केलेली कारवाई सुद्धा कायद्याला अनुसरून नाही. तपास पूर्ण झाला असून आरोपत्र दाखल झाले आहे,तसेच, कुटुंबाची जबाबदारी लक्षात घेता जामीन देण्याची मागणी करण्यात आली.

### सरकारी पक्षाचा तीव्र विरोध

सरकारी वकिलांनी जामीनाला जोरदार विरोध करताना नमूद केले की, हा अत्यंत गंभीर आणि नियोजित खून आहे. आरोपीविरोधात प्राथमिक पुरावे उपलब्ध आहेत. आरोपी बाहेर आल्यास साक्षीदारांवर दबाव टाकण्याची शक्यता.तसेच, एका आरोपीचा अजूनही शोध सुरू असल्याचेही नमूद करण्यात आले.

### उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा संदर्भ

बचाव पक्षाने औरंगाबाद खंडपीठाच्या २२ डिसेंबर २०२२ च्या निर्णयाचा दाखला देत, समान परिस्थितीतील सहआरोपींना जामीन मिळाल्याचे निदर्शनास आणले. न्यायालयाने हा मुद्दा ग्राह्य धरत, सद्य आरोपीची भूमिका देखील तत्सम असल्याचे नमूद केले.

### न्यायालयाचे निरीक्षण

न्यायालयाने नमूद केले की,आरोपीने उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात उपाययोजना सुरू ठेवली होती. त्यामुळे त्याच्या फरार असल्याचा मुद्दा ग्राह्य धरता येत नाही.सहआरोपींप्रमाणेच भूमिका असल्याने समतोल तत्त्व लागू होते.

### जामिनाच्या अटी

न्यायालयाने २ लाख रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर करत विविध अटी घातल्या आहेत. साक्षीदारांशी कोणत्याही प्रकारे संपर्क साधू नये, कोणत्याही व्यक्तीमार्फत साक्षीदारांवर प्रभाव टाकू नये, प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत पारनेर पोलीस ठाण्यात हजेरी लावावी. आरोपींच्या वतीने ॲड. परिमल फळे यांनी काम पाहिले. त्यांना ॲड. साक्षी जाधव, ॲड. शुभम राजुरकर ॲड. प्रतीक ढमढेरे, ॲड. आकाश पवार यांनी सहाय्य केले.

# चंदेरी

## कपूर कुटुंबाच्या चार पिढ्या एकाच छताखाली!

कपूर कुटुंबाच्या प्रसिद्ध पार्ट्यांबद्दल सर्वांनीच ऐकले असेल. या कुटुंबाच्या डायनिंग टेबलवर घडणाऱ्या सर्व नाट्यमय घटनांचे साक्षीदार होण्याची संधी तुम्हाला मिळाली तर? हे ऐकायला विचित्र वाटतंय, पण नेटफ्लिक्सचा आगामी शो 'डायनिंग विथ द कपूर्स' हा नेमका याचबद्दल आहे आणि आता निर्मात्यांनी या शोचा ट्रेलर रिलीज केला आहे, त्याचा २१ नोव्हेंबर रोजी प्रीमियर होणार आहे. ट्रेलरची सुरुवात रणबीर कपूर, सैफ अली खान, करीना कपूर, करिश्मा कपूर आणि इतरांनी एकमेकांना शुभेच्छा देताना केली आहे आणि तिथून तुम्हाला अनेक अंतर्गत गप्पांची झलक बघायला मिळते. जवळजवळ एक शतक, कपूर कुटुंबाने बॉक्स ऑफिसवर आणि आपल्या हृदयावर राज्य केले आहे. या कुटुंबात अमिताभ बच्चन यांची नात नव्याला पाहून अनेक लोक आश्चर्यचकित झाले आहेत. ती देखील कपूर कुटुंबाचा भाग कशी आहे याबद्दल आश्चर्यचकित आहेत. खरं तर, नव्याचे पिता निखिल नंदा हा राज कपूरची मुलगी रितू नंदा हिचा मुलगा आहे, ज्याचे लग्न अमिताभ बच्चन यांची मुलगी श्वेताशी झाले आहे.



### अभिनेत्री हुमा कुरेशीची विशेष मुलाखत

## रडणे, तक्रार करण्याऐवजी नशीब स्वत:च्या हातात घेतले!



**हिंदी चित्रपटसृष्टीत हुमा कुरेशीने आता आपले स्थान बळकट केले आहे. तिने तिच्या पहिला चित्रपट 'गँग्स ऑफ वासेपूर'मध्येच अभिनयाची चमक दाखवली. त्यानंतर तिने ओटीटीवर 'महाराणी' बनून क्षमता सिद्ध केली. या शोचा चौथा सीझन लवकरच येत आहे. असे असूनही हुमा म्हणते, की तिला तिच्या प्रतिभेला न्याय देणाऱ्या मोठ्या किंवा चांगल्या संधी अजूनही मिळालेल्या नाहीत... तिची खास मुलाखत...**

- प्रश्न : या वर्षी, तू अभिनयाच्या पलीकडे एक पाऊल टाकले आणि चित्रपट निर्मितीत प्रवेश केला. निर्माती बनण्याचा विचार तुला कसा सुचला?

» हुमा : निर्माती बनण्याचा विचार यामुळे आला, कारण ही इंडस्ट्री तुम्हाला जास्त संधी देत नाही. मी खूप काम केले आहे, तरीही मला अजूनही अनेक ठिकाणी नाकारले जाते किंवा मला हवे असलेले चित्रपट मिळत नाहीत. जर तुम्ही माझ्या फिल्मोग्राफीकडे पाहिले तर मला अशा चित्रपटांमुळे चाहत्यांचे प्रेम मिळाले आहे, जे चित्रपट इतर कोणीही करू इच्छित नव्हते. मला सर्वोत्तम संधी अजूनही मिळत नाहीत, की माझ्यासाठी मोठ्या बजेटचे चित्रपटही बनवले जात नाहीत. मी मला ज्या संधी मिळतात, त्यांचा पुरेपूर फायदा घेते. मात्र जेव्हा तुम्हाला वाटते की तुम्ही हे करू शकता, तरीही दुसरी व्यक्ती तुम्हाला ती संधी देत नाही. तेव्हा मला खूप वाईट वाटते. म्हणून मी विचार केला की रडण्याऐवजी आणि तक्रार करण्याऐवजी आपले नशीब स्वतःच्या हातात घेणे आणि आपल्याला हवे असलेले चित्रपट बनवणे चांगले. म्हणून, साकिब (अभिनेता भाऊ साकिब सलीम) आणि मी एकत्र येऊन ही कंपनी सुरू केली. आम्ही चित्रपट बनवत राहू आणि प्रत्येकाकडून काहीतरी शिकू.

- प्रश्न : आजकाल इंस्टाग्रामच्या अल्गोरिथमवर आधारित चित्रपट बनवले जात आहेत. अशा गोष्टी तुम्हाला एक सर्जनशील व्यक्ती म्हणून खटकतात का?

» हुमा : अल्गोरिथमवर आधारित चित्रपट बनवू नयेत. ही एक्सेल शीट नाही, जिथे तुम्ही दोन आणि दोन जोडून चार बनवता. ही एक क्रिएटिव्ह प्रोसेस आहे. इथे कोणती गोष्ट कशी बनेल, हे तुम्ही सांगू शकत नाही. त्यामुळे चित्रपट निर्मितीमध्ये अशी गणिते लागू करणे मूर्खपणाचे आहे. जर एखादी गोष्ट हिट झाली तर तुम्ही त्याची शंभर कारणे सांगू शकता, परंतु जर तुम्ही त्या कारणांवर आधारित चित्रपट बनवला तर तुमच्यापेक्षा मूर्ख कोणीही नाही.

- प्रश्न : तू यशसोबत 'टॉक्सिक' या दक्षिण भारतीय चित्रपटातही काम करत आहेस. तुला काय वाटतं दक्षिण भारतीय चित्रपट निर्माते योग्य काम करत आहेत, ज्यातून बॉलिवूडने काही शिकायला हवं?

» हुमा : दाक्षिणात्य चित्रपट निर्माते हे त्यांच्या मुळाशी रुजलेल्या कथा सादर करतात. ते त्यांच्या लोकांच्या कहाण्या सांगतात. पाश्चिमात्य देशांपासून प्रभावित होऊन ते चित्रपट बनवत नाहीत. त्यामुळे त्यांचे चित्रपट अस्सल वाटतात. आपल्याकडे सर्व काही असतानाही आपल्याला माहित नाही की आपला प्रेक्षक कोण आहे.

- प्रश्न : तुझा नवीन चित्रपट 'सिंगल सलमा' हा मुलींवर लग्न करण्यासाठी किती दबाव आहे हे दाखवतो. लग्नाबद्दल कोणी तुला कधी सल्ला दिला आहे का, की तुझे लग्नाचे वय होऊन चालले आहे असं...

» हुमा : पर्सनली तर मला असं कुणी बोललं नाही. पण आपल्या समाजात मुलींवर लग्न करण्याचा नेहमीच दबाव असतो. २५ वर्षांनंतर लग्न कधी होईल? हा एक मोठा मुद्दा आहे. तुम्ही दुधाच्या डब्यासारखे किंवा फळासारखे आहात जे लवकर विकले नाही तर ते शिळे होईल आणि फेकून द्यावे लागेल. आपण मुलींना ओझ्यासारखे, वस्तूसारखे वागवणे थांबवले पाहिजे. दबावाखाली लग्न होऊ नये.

- प्रश्न : तू तुझी सिंगल स्टेटस सोडून लवकरच लग्न करणार आहेस अशी चर्चा आहे?

» हुमा : तुम्ही सिंगल आणि मिंगल हे दोन्ही सुंदरपणे एकत्र केले आहेत. पण मी माझ्या वैयक्तिक आयुष्याबद्दलच्या प्रश्नांची उत्तरे देऊ इच्छित नाही. ते माझे वैयक्तिक आयुष्य आहे, म्हणून ते खासगी आणि वैयक्तिक ठेवूया.

- प्रश्न : तू दिल्ली क्राइम ३ या वेब सिरीजमध्ये 'बडी दीदी'ची नकारात्मक भूमिका साकारली आहेस. ती नकारात्मकता स्वतःवर आणणे किती कठीण होते?

» हुमा : खूप कठीण होते. प्रथम, नकारात्मक भूमिका साकारण्याची ही माझी पहिलीच वेळ आहे. ते पात्र खूप वाईट आहे, म्हणून ते साकारताना मी स्वतःशी खूप संघर्ष केला. मी मुलींच्या सक्षमीकरणावर विश्वास ठेवते आणि हा मुलींच्या तस्करीचा मुद्दा आहे. कलाकार म्हणून त्यावर प्रकाश टाकणे ही आपली जबाबदारी आहे. म्हणून, जर हुमा कुरेशीच्या या पात्राच्या साकारण्याने हा मुद्दा किंवा शो मोठा झाला आणि चर्चा सुरू झाली तर मला ते करायला आनंद होईल.

- प्रश्न : तुम्हाला मुळात तुमच्या 'झेबाः ॲन ॲक्सिडेंटल सुपरहिरो' या कादंबरीच्या कथेवर आधारित चित्रपट बनवायचा होता. तुमची अजूनही ती इच्छा आहे का?


» हुमा : मी त्यावर नक्कीच एक चित्रपट बनवेन. मी त्याची निर्मिती करेन, त्यात अभिनय करेन आणि मी तो नक्कीच बनवेन.

- प्रश्न : 'महाराणी', 'तरला', 'डबल एक्सेल' किंवा अलीकडील 'सिंगल सलमा' तुझे सर्व प्रोजेक्ट मुलींशी संबंधित महत्त्वाचे मुद्दे उपस्थित करतात...

» हुमा : मी भारतातील मुली आणि महिलांसाठी कथा बनवत आहे. मला ऑल गर्ल सुपरस्टार बनायचे आहे. ते माझे स्वप्न आहे. मला आमच्या (मुलींच्या) कथा, आमच्या समस्या, आमच्या गोष्टींबद्दल लोकांना सांगायचे आहे. जे इतर करत नाहीत.

- प्रश्न : तुम्ही गेल्या पाच वर्षांपासून 'राणी भारती' म्हणून जगत आहात. या शोने तुमच्या आयुष्यात आणि कारकिर्दीत कोणते योगदान दिले आहे असे तुम्हाला वाटते?

» हुमा : 'राणी भारती' ही अशी भूमिका आहे ज्याने माझे जीवन बदलले. या भूमिकेसाठी मला चाहत्यांचे खूप प्रेम मिळाले. असे प्रेम खूप कमी कलाकारांनी पाहिले आहे. त्याचा चौथा सीझन येत आहे, जो स्वतःच एक मोठी उपलब्धी आहे, कारण २०२१ मध्ये आम्ही सुरुवात केली तेव्हा फारसे लोक आमच्यावर विश्वास ठेवत नव्हते. वैयक्तिक पातळीवर, राणी भारतीने मला अधिक मजबूत आणि अधिक बोलके बनवले आहे.



### 'कांतारा : चॅप्टर १' अभिनेता गुलशन देवैयाची मुलाखत

## मी कोणालाही माझा गॉडफादर मानत नाही!



**बेंगळुरूमध्ये विद्यार्थ्यांना फॅशन शिकवणारा गुलशन देवैया अभिनयाकडे वळला. हा मार्ग त्याच्यासाठी अजिबात सोपा नव्हता. दॅट गर्ल इन यलो बूट्स, शैतान, हंटर आणि मर्द को दर्द नही होता सारख्या चित्रपटांतील अभिनयामुळे कौतुक मिळवल्यानंतर तो 'कांताराः चॅप्टर वन'मध्ये दिसला. चित्रपटातील त्याच्या भूमिकेसाठी बरेच कौतुक झाले आहे. यानिमित्ताने त्याची खास मुलाखत...**

> मला फॅशनसोबत प्रयोग करायला आवडते. लोकांना आवडत नसेल तर ते ठीक आहे. ते नक्कीच टिप्पणी करू शकतात.

कांताराः चॅप्टर १ या चित्रपटाच्या अभूतपूर्व यशाबद्दल आणि त्याच्या भूमिकेच्या झालेल्या कौतुकाबद्दल गुलशन म्हणतो, की माझ्या कामाची नेहमीच प्रशंसा आणि कौतुक झाले आहे. परंतु मला आजवर इतका ब्लॉकबस्टर चित्रपट कधीच मिळाला नव्हता. यामुळे माझ्या कारकिर्दीसाठी भविष्यात उघडणारे दरवाजे महत्त्वपूर्ण असतील. आपल्या इंडस्ट्रीत, कोणाच्या चित्रपटाने किती कमाई केली हे नेहमीच महत्त्वाचे असते. मला वाटते की माझा रेटही आता वाढेल. मी सध्या हे यश एन्जॉय करत आहे.

**आई-वडिलांची सेवा करणे माझे कर्तव्य!**

गुलशनला कला त्याच्या पालकांकडून वारशाने मिळाली. तो म्हणतो, की माझे पालक दोघेही कलाकार आहेत. मला त्यांच्याकडून संगीत, नाटक आणि चित्रकला वारशाने मिळाली. आज, ते माझ्या कामगिरीवर आनंदी आहेत. परंतु मला वाईट वाटते की ते कांतारा अध्याय एक पाहू शकले नाहीत. काही दिवसांपूर्वी, माझ्या वडिलांची कंबर एका रस्ते अपघातात मोडली आहे. ते बेंगळुरूमध्ये एका हिट-अँड-रनचे बळी ठरले. शस्त्रक्रियेदरम्यान आणि उपचारादरम्यान मी त्यांच्यासोबत होतो. माझ्या आईबद्दल बोलायचे झाले तर, ती थिएटरमध्ये जाऊ शकत नाही; ती अपंग आहे. ती बरेच काही करू शकत नाही. म्हणून मला तिला आंघोळ घालावी लागते आणि केस विंचरून द्यावे लागतात. ती अनेक वर्षांपासून आजारी आहे. ती माझा चित्रपट फक्त विशेष स्क्रीनिंगमध्ये किंवा ओटीटी प्लॅटफॉर्मवरच पाहू शकते. माझी आई १९८४ पासून आजारी आहे. तिची रोगप्रतिकारक शक्ती नेहमीच कमी आहे. माझ्या आईची प्रकृती नेहमीच खराब असते. सुरुवातीला ती आजारी असतानाही ऑफिसला जायची. माझे वडील इतर गोष्टींची काळजी घेत असत. २०१९ पासून ती अंथरुणाला खिळलेली आहे. असे असूनही, २००८ मध्ये मी अभिनय करण्यासाठी घराबाहेर पडलो तेव्हा माझ्या पालकांपैकी कोणी एकदाही विचारले नाही की त्यांचे काय होईल. मला कोणीही थांबवले नाही. माझी आई ७७ वर्षांची आहे आणि माझे वडील ८९ वर्षांचे आहेत, तरीही माझी आई माझ्याकडून एकही रुपया घेत नाही. मी जेव्हा जेव्हा त्यांना पैसे देतो तेव्हा ते परत करतात. त्यांनी मला माझ्या इच्छा पूर्ण करण्यापासून कधीही रोखले नाही, म्हणून आज माझ्या पालकांची सेवा करणे माझे कर्तव्य आहे, असे गुलशनने सांगितले.



**पालकही माझ्या फॅशन सेन्सवर प्रश्न करतात...**

गुलशनला त्याच्या फॅशन सेन्समुळे ट्रोलिंगचा सामना करावा लागला आहे. तो म्हणतो, की मी लहानपणापासूनच फॅशनशी जोडलेला आहे. NIFT मधून फॅशन डिप्लोमा केल्यानंतर मी जवळजवळ आठ वर्षे बेंगळुरूमधील एका कॉलेजमधील विद्यार्थ्यांना फॅशन शिकवले. मी आठ वर्षे डिझायनर म्हणूनही काम केले. माझ्या ड्रेसिंगसाठी ट्रोल होण्याबाबत मला वाटते की फॅशन मजेदार असावी. कधीकधी माझे पालकही विचारतात, तू हे का घालतोस? ते चांगले दिसत नाही. पण मला ते आवडते. मी ते मजेसाठी करतो. मी स्वस्ताईसाठी, कोणालाही दुखावण्यासाठी किंवा कोणत्याही संस्कृतीची थट्टा करण्यासाठी फॅशन करत नाही.

**माझा पहिला चित्रपट प्रदर्शित झाला नाही...**

संघर्षाबद्दल गुलशन म्हणतो, की मला माझ्या संघर्षाबद्दल रडायचे नाही. कारण तो प्रवासाचा एक भाग आहे. मला नकार मिळाला, पण मला स्वीकृतीही मिळाली. मी कोणालाही माझा गॉडफादर मानत नाही. तुम्हाला स्वतःचा मार्ग शोधावा लागेल. माझ्या पहिल्या चित्रपट टीना की चाबीमध्ये मी फक्त तीन दिवस काम केले. त्या चित्रपटात माझे बरेच मित्र होते आणि दिग्दर्शकदेखील एक ओळखीचा होता. त्या चित्रपटाचा नायक रणवीर शौरी होता. तो चित्रपट प्रदर्शित झाला नाही. तांत्रिकदृष्ट्या माझा पहिला प्रदर्शित झालेला चित्रपट दॅट गर्ल इन यलो बूट्स होता. त्या चित्रपटानंतर माझ्या कारकिर्दीला वेग आला.

**कंतारा : चॅप्टर वन मधील भूमिका मला नजरेसमोर ठेवून लिहिली गेली...**

गुलशन सांगतो, की २०१९ मध्ये के. डी. सतीश चंद्रा यांनी माझी ऋषभ शेट्टीशी ओळख करून दिली. तेव्हाच मला समजले की त्याला त्याच्या कला आणि कामाबद्दल एक अनोखी आवड आहे. आम्ही एकत्र आणखी काही चित्रपटांची घोषणा केली होती, पण ते यशस्वी झाले नाहीत. मग एके दिवशी त्याने फोन केला आणि त्याच्या लेखन टीमसह मला सांगितले की तुला नजरेसमोर ठेवून एक भूमिका लिहिली गेली आहे. तथापि, चित्रीकरण सोपे नव्हते. हवामान भयानक होते आणि रस्ते किंवा पूल नव्हते. वाहने जाऊ शकत नसताना ऋषभ यांनी पूल बांधला. सर्व आव्हाने असूनही, कठीण परिस्थितीतही उत्कृष्टतेने चित्रपट पूर्ण करण्याची त्याची आवड अतुलनीय होती.

## प्रकाश कौर यांनी घेतली होती धर्मेंद्रांची बाजू



**ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचं वैयक्तिक आयुष्य नेहमीच चर्चेत राहिलं आहे. याचं कारण म्हणजे त्यांची दोन लग्नं. धर्मेंद्र यांचं पहिलं लग्न प्रकाश कौरशी झालं होतं, त्यांना चार अपत्ये होती. तरीही त्यांनी हेमा मालिनींशी प्रेमविवाह केला होता. दुसऱ्या लग्नानंतर धर्मेंद्र टीकेचे धनी ठरले होते, तेव्हा प्रकाश कौर यांनी त्यांची बाजू घेतली होती...**

प्रकाश कौर यांना लग्नापूर्वी काही वेळा भेटल्याचं हेमा मालिनींनी त्यांच्या आत्मचरित्रात लिहिलं होतं. धर्मेंद्र यांच्याशी लग्न केल्यावर मात्र कधीच हेमा मालिनी प्रकाश कौर यांना भेटल्या नाहीत. हेमा मालिनी लग्नानंतर कधीच धर्मेंद्र यांच्या जुहू येथील बंगल्यातही गेल्या नाहीत. हेमा व धर्मेंद्र यांचे बंगले काहीच अंतरावर आहेत. याबद्दल हेमा मालिनी यांनी म्हटलं होतं, की मला कोणालाही त्रास द्यायचा नव्हता. धरमजींनी माझ्यासाठी आणि माझ्या मुलींसाठी जे काही केलं, त्याबद्दल मी आनंदी आहे. त्यांनी वडिलांची योग्य भूमिका बजावली. मी माझ्या जगात आनंदी आहे. मला माझ्या दोन मुली आहेत आणि मी त्यांना योग्य पद्धतीने वाढवलंय. अर्थात, ते (धर्मेंद्र) नेहमीच आमच्यासाठी होते. कोणालाही त्यांच्या जोडीदारापासून दूर राहणे आवडत नाही, परंतु कधीकधी परिस्थिती अशी असते की ती स्वीकारावी लागते, असं हेमा म्हणाल्या होत्या. धर्मेंद्र यांनी दुसरं लग्न केल्यावर त्यांच्यावर चौफेर टीका झाली होती, पण प्रकाश कौर यांनी पतीची बाजू घेतली होती. फक्त माझाच नवरा का? कोणत्याही पुरुषाने माझ्यापेक्षा हेमाला पसंत केलं असतं. अर्धी इंडस्ट्री अशीच आहे, तरी माझ्या नवऱ्याला स्त्रीलंपट म्हणण्याची लोकांची हिंमत कशी होते? तो कदाचित सर्वात चांगला नवरा नसेल, पण तो माझ्याशी खूप चांगला वागतो. तो उत्तम बाबा आहे, त्याची मुलं त्याच्यावर खूप प्रेम करतात. तो कधीही त्यांच्याकडे दुर्लक्ष करत नाही, असं १९८१ ला दिलेल्या मुलाखतीत प्रकाश कौर म्हणाल्या होत्या. प्रकाश कौर त्यावेळी हेमा मालिनींबद्दल व्यक्त झाल्या होत्या. हेमा कोणत्या परिस्थितीतून जात आहे हे मी समजू शकते. तिलाही जगाचा, तिच्या नातेवाईकांचा आणि मित्रांचा सामना करावा लागतो. पण जर मी हेमाच्या जागी असते तर तिने जे केलं ते मी केलं नसतं. एक महिला म्हणून, मी तिच्या भावना समजू शकते. पण एक पत्नी आणि आई म्हणून मला ती मान्य नाही, असं प्रकाश कौर यांनी म्हटलं होतं.

## शॉर्ट न्यूज

### सुमन काळे मृत्यू प्रकरणाचा फेरतपास करा

■ **श्रीगोंदा :** आमदार विक्रम पाचपुते यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अहिल्यानगर येथील सुमन काळे यांच्या १७-१८ वर्षांपूर्वी पोलिस कोठडीत झालेल्या मृत्यूचा मुद्दा उपस्थित केला. नुकत्याच आलेल्या अहवालानुसार, सुमन काळे यांना बेकायदेशीरपणे कोठडीत ठेवून अमानुष मारहाण करण्यात आली होती, ज्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. या गंभीर प्रकरणाची फेरतपासणी करण्यासाठी विशेष तपास पथक स्थापन करण्याची मागणी पाचपुते यांनी केली आहे.

### कर्मचारी मारहाण प्रकरणाला वेगळे वळण

■ **संगमनेर :** पंचायत समितीतील तालुका अभियान व्यवस्थापकाला मारहाण झाल्याच्या घटनेनंतर बाळासाहेब थोरात यांचे चुलत बंधू शरद थोरात, त्यांची दोन मुले आणि इतर नऊ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा नोंदवून दोन आरोपींना अटक केली आहे.

### अल्पवयीन मुलीच्या विवाहाचा प्रकार

■ **राहुरी :** तालुक्यात १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचे लग्न लावल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या विवाहित मुलीला दोन मुलेही झाली आहेत. याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात संजय व नंदा पप्पू ऊर्फ पोपट लक्ष्मण सुरसे, लक्ष्मण सुरसे, लता लक्ष्मण सुरसे, नारायण पुंजा मोरे आणि भागु नारायण मोरे यांच्यासह एकूण सात जणांविरुद्ध पोक्सो आणि बालविवाह प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुलीच्या जबाबावरून ही कारवाई करण्यात आली आहे.

### जागेच्या वादातून महिलेला मारहाण

■ **अहिल्यानगर :** तालुक्यातील वाळकी परिसरात जागेच्या कारणावरून एका महिलेला आणि त्यांच्या वृद्ध नातेवाईकाला बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात आरोपी मच्छिंद्र विष्णू कासार याच्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलीस हवालदार माने या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

### अशोक खरात यांचे शिर्डी-राहता कनेक्शन

■ **राहता :** अहिल्यानगर जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात भोंदूबाबा अशोक खरातचे प्रकरण चर्चेत आहे. या भोंदूबाबाचे मूळ शिर्डी आणि राहाता तालुक्यात असल्याचे समोर आले आहे. शिर्डी, साकुरी आणि काकडी विमानतळ परिसरात जमीन खरेदी, आलिशान हॉटेल्स आणि कोट्यवधींच्या आर्थिक व्यवहारातून त्याने मोठे साम्राज्य उभारले आहे. श्रद्धेच्या नावाखाली उभारलेले हे आर्थिक जाळे आता संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे.

# शहरात दररोज गरजूंना मिळणार मोफत भोजन

## स्व. अरुणकाका जगताप अन्न छत्रालयाला प्रारंभ



**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**माजी आमदार स्व. अरुणकाका जगताप यांच्या जयंतीनिमित्त काका ट्रस्टच्यावतीने स्व. अरुणकाका जगताप अन्न छत्रालयाचा शुभारंभ जैनमुनी अलोकऋषीजी महाराज व ग्रामदैवत श्री विशाल गणपती देवस्थानचे महंत संगमनाथ महाराज यांच्या हस्ते झाले. मार्केटयार्ड जवळील इंद्रप्रस्थ मंगल कार्यालयासमोरील नागेश्वर महादेव मंदिरात हे अन्नछत्रालय सुरु करण्यात आले आहे.**

याठिकाणी दररोज सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत गरजूंना मोफत भोजन मिळणार आहे. यावेळी पार्वतीबाई जगताप, महापौर ज्योती गाडे, भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, आ. संग्राम जगताप, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सचिन जगताप, सुवर्णा जगताप, माजी नगरसेविका शीतल जगताप आदी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित सर्वांनी स्व.अरुण जगताप यांच्या स्मृतींना व केलेल्या कार्याचे स्मरण केले. यावेळी अरविंद शिंदे, राजेंद्र चोपडा, सुहास मुळे, ज्ञानेश्वर रासकर, सुमतीलाल कोठारी, भगवान फुलसौंदर, विजय परदेशी, अजय फुंदे, गणेश कवडे, अविनाश घुले व अनिल मोहिते आदींनी मनोगत व्यक्त करून स्व. अरुणकाका जगताप यांच्या स्मृती जागवल्या.

आमदार संग्राम जगताप म्हणाले, स्व. अरुणकाका जगताप यांनी कायम अन्नदानाला महत्त्व देत विविध उपक्रम राबवले. त्यांच्या पश्चात हा वारसा अखंडितपणे पुढे नेण्यासाठी तसेच गरजूंना मदत व्हावी या उद्देशाने सुरु केलेले हे मोफत अन्नछत्र अखंडितपणे दररोज सुरू राहणार आहे. स्व. अरुणकाकांच्या प्रथम वर्षश्राद्ध दिनी दि.२१ एप्रिल रोजी मोठ्या स्वरूपात अध्यात्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

# शनिशिंगणापुरात बॅरिकेट्समुळे व्यावसायिकांमध्ये तीव्र संताप

## अडथळ्यांचा व्यवसायावर प्रतिकूल परिणाम होत असल्याची तक्रार

**सोनई : प्रतिनिधी**

**श्री क्षेत्र शनिशिंगणापूर येथे सध्या प्रशासनाच्या कारभारावरून नवा वाद निर्माण झाला आहे. विश्वस्त मंडळ बरखास्त झाल्यानंतर प्रशासक मंडळाकडे कारभार असताना रस्त्यावर लावण्यात आलेल्या बॅरिकेट्समुळे स्थानिक व्यावसायिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.**


पूर्वी शनिशिंगणापूरमध्ये प्रवेश करताच तथाकथित 'लटकू' वाहनधारकांकडून शनिभक्तांचा पाठलाग करून पूजा साहित्य खरेदीसाठी जबरदस्ती केली जात होती. या प्रकारामुळे भाविक त्रस्त झाले होते. तसेच भरधाव मोटारसायकलींमुळे अपघातांचे प्रमाण वाढले होते. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थ आणि प्रशासनाने एकत्र येत कारवाई करत रस्त्यावर उभे राहून अडथळा निर्माण करणाऱ्या लटकूंना आळा घातला. या निर्णयाचे भाविक आणि स्थानिकांकडून स्वागतही झाले.मात्र, गेल्या काही दिवसांपासून परिस्थिती वेगळीच वळण घेताना दिसत आहे.



शनिशिंगणापूरमधील खासगी पार्किंगकडे जाणाऱ्या रस्त्यांच्या मधोमध पोलिस प्रशासनाने बॅरिकेट्स उभारले आहेत. यामुळे पूजा साहित्य दुकाने, नाश्ता केंद्रे, नारळपाणी, फळ विक्रेते तसेच लॉजिंग व्यवसायिकांकडे जाणाऱ्या वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात घटली आहे. या अडथळ्यामुळे खासगी पार्किंग परिसरातील शेकडो व्यवसायिकांवर उपासमारीची वेळ येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ''व्यवसाय ठप्प झाला आहे, कर्जाचे हप्ते कसे भरायचे आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा?'' असा प्रश्न व्यावसायिकांनी उपस्थित केला आहे.

**वाचकांच्या लेखणीतून**

# भोंदूगिरीला आळा बसलाच पाहिजे!



**हल्ली भोंदू बाबाचे प्रकरण गाजते आहे. भोळेभाबडे आणि समस्यांच्या ओझ्याखाली दबलेले सांसारिक जन या बाबांच्या जाळ्यात सहज अडकले जातात. राजकीय क्षेत्रातील व्यक्तीही त्यात गुंतल्या आहेत. याला काय म्हणावे? ज्यांनी समाज पुढे न्यावा अशा राजकीय नेत्यांनी या विकृत मार्गात फसावे? आपल्या संत तुकाराम महाराजांसारख्या संत महंतांनी सांगितले, नवसे सायासे पुत्र होती, तरी का करणे लागे पती? संत गाडगे बाबांनीही समाजाच्या कानी कपाळी ओरडून सांगितले. पण कसचे काय नि कसचे काय! भारतीय आयुर्वेदाच्या इतिहासात किमया (केमिस्ट्री) याबाबत चर्चा झालेली आहे. कृत्रिम सोने तयार करण्याचे प्रस्थ माजले होते. त्यासाठी हे किमयागार समाजाच्या अज्ञानाचा फायदा घेत. त्यातून भाबड्या लोकांकडून धन उकळले जायचे. नरबळीही दिले जायचे. पण तेथे लैंगिक अत्याचाराचे उल्लेख सापडत नाहीत!**

**हल्ली मात्र कमालच झाली! धन उकळणे, नरबळी देणे, महिलांवर अत्याचार करणे, मोठमोठ्या राजकीय व्यक्तींशी संबंध दाखवून समाजात दहशत पसरविणे. असे प्रकार वाढत चालले आहेत. आधुनिकतेच्या प्रवाहाखालून समांतर असा भोंदूगिरीचा एक प्रवाह वाहतो आहे. याला आळा बसलाच पाहिजे. समाजाच्या अज्ञानावर उभारलेली मनोरथे टिकाऊ नसतात!**

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहिल्यानगर

# रोहित पवारांचे प्रसिद्धीसाठी माझ्यावर आरोप

## अजितदादांच्या अपघातानंतर काय घडले ते सांगायला लावू नका । सुनील तटकरेंचा इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**



**राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सुनील तटकरे यांनी आमदार रोहित पवार यांच्यावर पलटवार करताना मोठा राजकीय गौप्यस्फोट केला आहे. ''अजितदादांच्या अपघातानंतर हॉस्पिटलमध्ये काय घडलं, तिथपासून ते पोस्टमॉर्टमपर्यंतची इत्यंभूत माहिती माझ्याकडे आहे. त्यामुळे मर्यादा ओलांडू नका, अन्यथा मला तोंड उघडावे लागेल,'' असा खळबळजनक इशारा तटकरे यांनी दिला आहे. रोहित पवारांनी केलेल्या आरोपांनंतर तटकरे यांनी घेतलेल्या या आक्रमक भूमिकेमुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.**

शरद पवार गटाचे नेते रोहित पवार यांनी नुकताच एक खळबळजनक दावा केला होता की, ''खासदार सुनील तटकरे आणि खासदार प्रफुल्ल पटेल यांना दिवंगत नेते अजित पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष स्वतःच्या ताब्यात घ्यायचा होता.'' या विधानामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली होती. या आरोपांवर सुनील तटकरे यांनी आज आपली भूमिका स्पष्ट करत रोहित पवारांवर पलटवार केला.

**आम्ही अजितदादांची सावली बनून साथ दिली**

रोहित पवारांच्या आरोपांना उत्तर देताना तटकरे म्हणाले, ''माझ्यावर टीका होणे ही काही नवीन गोष्ट नाही. २०१४ सालापासून मला सातत्याने टार्गेट केले जात आहे. मात्र, मी कायम अजितदादांसोबत होतो. एनडीएमध्ये सहभागी होण्याचा निर्णय असो किंवा पक्षाची पुढील रणनीती, आम्ही सावलीसारखे त्यांच्या पाठीशी उभे होतो. अजितदादांनी राज्याच्या राजकारणात मिळवलेली पकड आणि त्यांची उंचावलेली प्रतिमा यात आमचाही खारीचा वाटा होता. रोहित पवार प्रसिद्धीसाठी मला टार्गेट करत आहेत.''

**गुपितांचा स्फोट करण्याचा इशारा**

सुनील तटकरे यांनी यावेळी रोहित पवारांचे नाव न घेता त्यांना शांत राहण्याचा सल्ला दिला. ते म्हणाले, ''अजित पवार यांचा अपघात झाल्यानंतर त्यांचे पार्थिव हॉस्पिटलला आणल्यापासून ते पोस्टमॉर्टमपर्यंत नेमके काय काय घडले, याची सर्व माहिती माझ्याकडे आहे. त्यामुळे कृपया थांबा, अन्यथा भविष्यात मला अनेक गोष्टी जाहीर कराव्या लागतील.'' या विधानामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, तटकरे नेमक्या कोणत्या गुपितांबद्दल बोलत आहेत, याची चर्चा सुरू झाली आहे.

पवार कुटुंबियांविरोधातील 'कटकारस्थाना'चा दावा

सुनील तटकरे यांनी केवळ पक्षावरच नाही, तर पवार कुटुंबातील सदस्यांविरुद्ध सुरू असलेल्या हालचालींवरही भाष्य केले. ''सुनेत्रा पवार, जय पवार आणि पार्थ पवार यांच्या विरोधात तुम्ही काय कटकारस्थान रचत होता, याची माहिती आमच्या सर्वांकडे आहे. आपल्याला सुसंस्कृत पद्धतीने राजकारण करायचे आहे, त्यामुळे ज्याला हा इशारा आहे त्याने तो समजून घ्यावा आणि वेळीच थांबावे,'' असेही तटकरे यांनी निक्षून सांगितले.

**राजकीय संघर्षाला नवे वळण**

रोहित पवार विरुद्ध सुनील तटकरे असा हा सामना आता केवळ राजकीय तत्त्वांपुरता मर्यादित न राहता, वैयक्तिक आरोप-प्रत्यारोपांच्या पातळीवर उतरला आहे. सुनील तटकरे यांनी दिलेल्या या सूचक इशाऱ्यामुळे आगामी काळात राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांतील संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

# मंत्री गोरेंच्या सांगण्यावरूनच आमचे अपहरण

## आमच्या एन्काउंटरचा पोलिसांचा डाव होता । अनिल देसाई व संदीप मांडवे यांचा गंभीर आरोप

**सातारा : प्रतिनिधी**

**राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या सांगण्यावरूनच सातारा पोलिसांनी आमचे अपहरण केले होते. महाबळेश्वरच्या घाटात सातारा पोलिसांचा आम्हाला एन्काऊंटर करून संपवण्याचा डाव होता. पोलिस अधिकारी रमेश गरजे यांना त्यांच्या राजकीय बॉसचा म्हणजे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचा सारखा फोन येत होता, असा खळबळजनक आरोप जिल्हा परिषद सदस्य अनिल देसाई व संदीप मांडवे यांनी केला.**

याप्रकरणी वाई न्यायालयाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अरुण देवकर यांना कारणे दाखवा नोटीस बजावल्याची माहिती यावेळी पत्रकार परिषदेत देण्यात आली.



जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी या प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांवर सुमोटो गुन्हा दाखल करावा व जिल्हा परिषदेच्या चौथ्या मजल्यावरील सर्व सीसीटीव्ही फुटेज तपासाच्या दृष्टीने उपलब्ध व्हावे याशिवाय जिल्हा परिषद अध्यक्ष उपाध्यक्षच्या निवडी पुन्हा घेण्यात याव्यात अशी मागणी यावेळी अनिल देसाई यांनी केली.

**आम्हाला पोलिसांनी फरफटत नेले**

अनिल देसाई म्हणाले, मतदानाच्या दिवशी आम्ही नेहमीप्रमाणे एका हॉटेलमधील बैठक संपवून जिल्हा परिषदेच्या सभागृहाकडे निघालो होतो. त्यावेळी पालकमंत्री स्वत: आमच्याबरोबर होते. आम्ही चौथ्या मजल्यावर गेलो असता, तेथे साध्या विषयातील शंभर एक पोलिस उभे होते. त्यांनी अचानक आम्हाला ताब्यात घेऊन जिल्हा परिषदेच्या मागच्या इमारतीमधील एका अरुंद पॅसेजमध्ये गाडी उभी होती तेथून त्यांनी आम्हाला सदर बाजार, मोळाचा ओढा तेथून मेढा मार्गे महाबळेश्वरच्या दिशेने गाडी पुढे नेली. सातारा पोलिसांनी अक्षरश: आम्हा दोघांना फरपटत नेले. संदीप मांडवे यांना २५ पोलिसांनी पकडले. यामध्ये त्यांचे कपडे फाटले आणि ते जखमी सुद्धा झाले.

(पान १ वरून)

### भोंदू खरातचे व्हिडिओ व्हायरल करणे पडले महागात

कुटुंबाची बदनामी होत आहे. कायद्यानुसार लैंगिक शोषणातील पीडितेची ओळख उघड करणे हा गंभीर गुन्हा आहे. तरीही काही व्यक्तींकडून हे व्हिडिओ सातत्याने फॉरवर्ड केले जात होते. याची गंभीर दखल घेत अहिल्यानगर पोलिसांनी कोपरगावमधील राहुल शिंदे, योगेश आढाव आणि बीडमधील संदीप गरजे या तिघांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम २९४ (२), ३ (५) आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६७ (अ) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

### भरधाव वाहनाच्या धडकेत मोपेडस्वाराचा मृत्यू

घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तातडीने तोरडे यांना जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ. खेडकर यांनी उपचारापूर्वीच त्यांना मृत घोषित केले.अपघाताची माहिती मिळताच मृताच्या नातेवाईकांनी जिल्हा रुग्णालयात मोठी गर्दी केली. यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली.

दरम्यान, हा अपघात नसून घातपाताचा प्रकार असल्याच्या चर्चाही परिसरात सुरू झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर तोफखाना पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.अपघातास कारणीभूत ठरलेल्या एका संशयितास पोलिसांनी ताब्यात घेतले असल्याची माहिती मिळाली आहे. जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अहवालावरून आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, नातेवाईकांच्या फिर्यादीवरून पुढील गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### सुमन काळे मृत्यू प्रकरणाला नवे वळण?

मिळण्यात झालेल्या विलंबामुळे पीडित कुटुंबीय व पारधी समाजात नाराजीचे वातावरण आहे.

दरम्यान, १३ जानेवारी २०२१ रोजी उच्च न्यायालयाने या प्रकरणात ट्रायल कोर्टाला सहा महिन्यांत खटला निकाली काढण्याचे निर्देश दिले होते, तसेच पीडित कुटुंबीयांना पाच लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेशही दिले होते. मात्र अद्याप या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

याच पार्श्वभूमीवर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी ६ फेब्रुवारी रोजी राज्य गुन्हे अन्वेषण विभागाला पत्र पाठवून या प्रकरणात अॅट्रोसिटी कायद्याच्या तरतुदी लागू करून फेरतपास करण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रक्रियेत 'विवेक विचार मंच' या सामाजिक संघटनेने काळे कुटुंबीयांना सक्रिय पाठबळ दिले आहे.

सीआयडीच्या तपासातील दिरंगाई व संशयास्पद भूमिकेवर बोट ठेवत आ. पाचपुते यांनी या गुन्ह्यातील सर्व बाबींचा सखोल पुनर्तपास व्हावा, आरोपींवर कठोर कलमांतर्गत कारवाई व्हावी आणि पीडितांना न्याय मिळावा यासाठी एसआयटीची नियुक्ती तातडीने करावी, अशी ठाम मागणी केली. यावर राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या परवानगीने एसआयटी नेमण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले असून त्यामुळे या प्रकरणात लवकरच महत्त्वपूर्ण घडामोडी घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### थरारक सरावाने नगर हादरले!

सक्रिय सहभाग दिसून आला. सर्व यंत्रणांनी एकत्रितपणे कार्य करत आपली तयारी दाखवून दिली.

ही केवळ सराव मोहीम असल्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. घटनेमागील सत्य समजल्यानंतर नागरिकांनी दिलासा व्यक्त केला. पोलिसांच्या या सतर्कतेमुळे भविष्यातील संभाव्य संकटांना तोंड देण्याची तयारी असल्याचा विश्वासही व्यक्त करण्यात आला. नगरमध्ये पार पडलेली ही 'मॉकड्रिल' केवळ एक सराव नव्हती, तर आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या सुरक्षेसाठी यंत्रणा किती सज्ज आहे, याचे प्रभावी प्रदर्शन होते.

# अळकुटीत 'धर्मरक्षक केसरी'साठी महामुकाबला

**लाखोंच्या बक्षिसांसह कुस्तीचा थरार उसळणार | सिकंदर शेख विरुद्ध हर्षद सदगिर यांच्यात मानाच्या गदेसाठी निर्णायक झुंज | राज्यभरातील नामांकित मल्लांचा सहभाग | पारनेर तालुक्यात कुस्तीप्रेमींसाठी ऐतिहासिक सोहळा**

अळकुटी : प्रतिनिधी

**ग्रामीण भागातील पारंपरिक क्रीडेला नवसंजीवनी देणारा भव्य कुस्ती महासंग्राम अळकुटीत रंगणार असून संपूर्ण तालुक्याचे लक्ष या स्पर्धेकडे लागले आहे. पैलवान ग्रुप, टायगर ग्रुप व धर्मरक्षक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेमुळे अळकुटी गावात सणासुदीचे वातावरण निर्माण झाले आहे.**

येथील साईनाथ विद्यालयाच्या विस्तीर्ण मैदानावर रविवार (ता. २९) रोजी सकाळी १० वाजल्यापासून कुस्त्यांना सुरुवात होणार आहे. कुस्तीप्रेमींसाठी दिवसभर थरारक सामने पाहण्याची पर्वणी लाभणार असून मैदानावर हजारोंच्या संख्येने प्रेक्षक उपस्थित राहण्याची शक्यता आहे.



## 'धर्मरक्षक केसरी' किताबासाठी लढत

या स्पर्धेचा केंद्रबिंदू ठरणारा ''धर्मरक्षक केसरी'' किताब जिंकण्यासाठी देशपातळीवरील दर्जेदार मल्ल आमनेसामने येणार आहेत. विजेत्यास तब्बल ३ लाख रुपयांचे रोख बक्षीस देण्यात येणार असल्याने या गदेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मुख्य लढतीत पैलवान सिंकदर शेख आणि पैलवान हर्षद सदगिर यांच्यात चुरशीची झुंज अपेक्षित असून दोन्ही मल्लांच्या ताकदीचा कस लागणार आहे. दोघेही आपल्या आक्रमक खेळशैलीसाठी ओळखले जात असल्याने ही लढत स्पर्धेचा कळस ठरणार आहे.

## विविध गटांमध्ये कुस्त्यांची रेलचेल

स्पर्धेत बालगट, युवक गट, खुला गट अशा विविध स्तरांतील कुस्त्यांचे नियोजन करण्यात आले आहे. प्रत्येक गटासाठी आकर्षक रोख बक्षिसे ठेवण्यात आली असून विजेते व उपविजेते यांना चषक, सन्मानचिन्हे आणि मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. या माध्यमातून नवोदित मल्लांना मोठ्या व्यासपीठावर खेळण्याची संधी मिळणार असून ग्रामीण भागातील प्रतिभावंतांना प्रोत्साहन देण्याचा आयोजकांचा उद्देश आहे.

## राज्यभरातून मल्लांची हजेरी

पुणे, मुंबई तसेच राज्यातील विविध जिल्ह्यांतून नामांकित पैलवान या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. त्यामुळे प्रत्येक लढत दर्जेदार आणि तितकीच रोमांचक ठरणार आहे. कुस्तीप्रेमींना पारंपरिक मातीतील कुस्तीचा खरा थरार अनुभवता येणार आहे.

## मान्यवरांच्या सहकार्याने आयोजन

या स्पर्धेसाठी स्थानिक उद्योजक, लोकप्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावर पुढाकार घेतला आहे. उद्योजक सोपान लंके, राजु शेख, सुनिल शेटे, जिल्हा परिषद सदस्य अमित घनदाट, पंकज कारखिले, दीपक ठोंबरे, डॉ. भास्कर शिरोळे, जितेश सरडे, अलताफ शेख, बंडू साबळे, सदानंद आवारी, कैलास आवारी, संजय बाबर, अर्पण बाबर, नगराध्यक्षा विद्या कावरे, गणेश मापारी, संदेश कापसे, श्रीकांत डेरे तसेच पारनेर तालुका पैलवान प्रतिष्ठानचे हनुमंत भोसले, बाळासाहेब पुंडे, संतोष काटे आदींचे विशेष योगदान लाभत आहे.

## लंके प्रतिष्ठानकडे प्रायोजकत्व

निलेश लंके प्रतिष्ठान प्रायोजक म्हणून या उपक्रमात सहभागी झाले असून शेकडो कार्यकर्ते व ग्रामस्थ आयोजनासाठी रात्रंदिवस मेहनत घेत आहेत. पारनेर तालुक्यात सुमारे दहा वर्षांपूर्वी निघोज येथे झालेल्या भव्य कुस्ती स्पर्धेनंतर अशी मोठी स्पर्धा प्रथमच अळकुटीत आयोजित करण्यात येत आहे. त्या वेळी राज्यातील शंभरहून अधिक नामांकित मल्लांनी सहभाग नोंदवून स्पर्धेची कीर्ती वाढवली होती. यंदाही त्याच धर्तीवर भव्य नियोजन करण्यात आले असून जुन्नर, शिरूर, पारनेर, श्रीगोंदा तसेच मुंबई, पुणे, अहिल्यानगर जिल्ह्यातील हजारो कुस्तीप्रेमी उपस्थित राहतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

## उपस्थितीचे आवाहन

स्पर्धेच्या निमित्ताने अळकुटी व परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले आहे. गावातील रस्ते, मैदान परिसर सजविण्यात आले असून प्रेक्षकांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. कुस्तीप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या महासंग्रामाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजक सुभाष वराळ, सुनिल म्हसके, शिवाजी उचाळे, महेश दाते, सचिन मोरे, किरण चौधरी, आदेश बरकडे यांनी केले आहे.

# सायबर सुरक्षा ही काळाची गरज

**रितेश पगारे यांचे प्रतिपादन | अळकुटी महाविद्यालयात सायबर सुरक्षा कार्यशाळा**

अळकुटी : प्रतिनिधी

आजचे युग हे डिजिटल युग म्हणून वेगाने पुढे सरकत असून इंटरनेट, मोबाईल, संगणक यांसारख्या साधनांचा वापर प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. बँकिंग, शिक्षण, व्यापार तसेच शासन व्यवस्था या सर्वच क्षेत्रांत तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. मात्र, या वाढत्या डिजिटल वापरामुळे सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही चिंताजनकरीत्या वाढत असल्याचे प्रतिपादन प्रारी वर्कफोर्स सोल्युशन एलएलपी कंपनीचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी रितेश पगारे यांनी केले.



## सायबर सुरक्षेच्या उपायांवर मार्गदर्शन

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी येथे रसायनशास्त्र व वाणिज्य विभागाच्या वतीने 'सायबर सुरक्षा' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पारनेर पंचायत समितीचे माजी सदस्य दिनेश बाबर उपस्थित होते. कार्यशाळेत सायबर हल्ले, डेटा चोरी, हॅकिंग, व्हायरस आक्रमण आणि ऑनलाइन फसवणूक यापासून कसे सुरक्षित राहावे याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

## 'सायबर सुरक्षा ही प्रत्येकाची जबाबदारी'

महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. कुंदा कवडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, अनेक नागरिक ऑनलाइन व्यवहार करताना ओटीपी शेअर करतात, अज्ञात लिंकवर क्लिक करतात किंवा बनावट संकेतस्थळांवर वैयक्तिक माहिती देतात. यामुळे आर्थिक फसवणूक, ओळख चोरी व डेटा चोरी यांसारखे गंभीर गुन्हे घडतात. विशेषतः बँकिंग व ई-कॉमर्स क्षेत्रात सायबर हल्ल्यांचे प्रमाण वाढत असल्याने सायबर सुरक्षा ही केवळ तांत्रिक बाब नसून प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. डिजिटल युगात सुरक्षित राहण्यासाठी सायबर सुरक्षेबाबत जागरूकता आणि ज्ञान अत्यावश्यक असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

## जागरूकतेतूनच डिजिटल भवितव्य

कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण झाली असून, सुरक्षित डिजिटल व्यवहारासाठी आवश्यक खबरदारी घेण्याचा संदेश देण्यात आला. वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर अशा कार्यशाळांची गरज अधिक अधोरेखित होत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## प्राध्यापक व विद्यार्थ्यांचा सहभाग

या कार्यशाळेस प्रा. साक्षी लकडे, प्रा. विशाल रोकडे, गोरख घोलप, सूर्यमाला भोर, प्रा. शर्मिष्ठा बोरुडे, प्रा. संजय जाधव, प्रा. दशरथ पानमंद, प्रा. दत्तात्रय शेळके, प्रा. प्रियंका दिवटे, प्रा. सुनिता जाधव, प्रा. विनायक सोनवणे, प्रा. पोपट सुंबरे, प्रा. मच्छिंद्र बेलोटे, प्रा. अमोल नालकर, प्रा. पूजा वैरागर, प्रा. पांडुरंग उघडे, प्रा. स्वाती फापाळे, प्रा. सुषमा करकंडे, प्रा. ऋषिकेश गिते, प्रा. अनुराधा गाढवे, डॉ. शांताबाई थोरात, प्रा. रावसाहेब झावरे, प्रा. संदीप गेटम, प्रा. राजाराम गोरडे यांसह प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अनुराधा गाढवे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सुषमा करकंडे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. संदीप गेटम यांनी केले.

# डिजिटल शिक्षणाची नवी पहाट

**सुपा जिल्हा परिषद शाळेला ५ लाखांचा स्मार्ट बोर्ड**



सुपा : प्रतिनिधी

**तालुक्यातील सुपा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला सुमारे पाच लाख रुपयांचा डिजिटल बोर्ड उपलब्ध झाल्याने शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेला नवी उभारी मिळणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना अधिक प्रभावी आणि आकर्षक पद्धतीने शिक्षण देणे आता शक्य होणार असल्याने शिक्षक व पालकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.**

## पाठपुराव्याला यश

सुपा गावचे माजी उपसरपंच तथा तालुका दूध संघाचे माजी अध्यक्ष दत्ता नाना पवार यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे हा उपक्रम साकार झाला. त्यांच्या प्रयत्नांना ग्रामपंचायत तसेच स्थानिक स्तरावरूनही मोठे सहकार्य मिळाले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या डिजिटल शिक्षण संकल्पनेतून, खासदार डॉ. सुजय विखे पाटील तसेच पारनेर मंडलाध्यक्ष राहूल शिंदे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. ग्रामीण शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

## डिजिटल शिक्षणाकडे पाऊल

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही आधुनिक शिक्षणाची जोड मिळावी या उद्देशाने हा डिजिटल बोर्ड शाळेला देण्यात आला आहे. यामुळे अध्यापन अधिक दृश्यात्मक, समजण्यास सोपे आणि विद्यार्थ्यांसाठी रुचकर होणार आहे. डिजिटल साधनांमुळे विद्यार्थ्यांचा अभ्यासातील सहभागही वाढण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## मान्यवरांची उपस्थिती

डिजिटल बोर्ड सुपूर्द करताना मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी तसेच दत्ता नाना पवार, मनसे तालुका अध्यक्ष अविनाश पवार, ग्रामपंचायत सदस्य ॲड. सुरेश नेटके, ज्येष्ठ उत्तम बाबुराव पवार, माजी सरपंच बाळासाहेब पवार, संकेत सोनवणे, सुरज काळे यांच्यासह पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ब्लॉकचेनमुळे डिजिटल व्यवहारांना बळ

**समर्थ अभियांत्रिकी महाविद्यालयात राज्यस्तरीय कार्यशाळा संपन्न**



कर्जुले हर्या : प्रतिनिधी

**समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'गुणवत्ता सुधार योजने'अंतर्गत ब्लॉकचेन टेक्नॉलॉजी या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानातील नव्या संकल्पनांची सखोल माहिती मिळाली.**

संस्थेचे विश्वस्त वल्लभ शेळके यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमास विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.

## राज्यभरातून प्रतिसाद

या कार्यशाळेत पुणे, अहिल्यानगर, नाशिक विभागातील अभियांत्रिकी महाविद्यालयांतील प्राध्यापक, बाबासाहेब आंबेडकर तांत्रिक विद्यापीठ लोणेरे येथील शिक्षकवर्ग तसेच औद्योगिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

## तज्ज्ञांचे मार्गदर्शन

विषयतज्ज्ञ डॉ. शीतल गिरमे यांनी ब्लॉकचेनची मूलभूत संकल्पना, विकेंद्रीत रचना, डेटा सुरक्षितता आणि पारदर्शक व्यवहार प्रणाली यावर सविस्तर मार्गदर्शन केले. प्रात्यक्षिक सादरीकरणाद्वारे व्यवहारांची नोंद, ब्लॉक्सची निर्मिती आणि त्यांची साखळी तयार होण्याची प्रक्रिया विद्यार्थ्यांना समजावून सांगितली.

## ब्लॉकचेनचे महत्त्व

डिजिटल युगात माहिती सुरक्षित ठेवणे आणि व्यवहार पारदर्शकपणे पार पाडणे ही गरज अधोरेखित होत असताना ब्लॉकचेन तंत्रज्ञान प्रभावी पर्याय म्हणून पुढे येत आहे. भविष्यात इंटरनेट वापराच्या पद्धतीत बदल घडवण्याची क्षमता या तंत्रज्ञानात असल्याचे विश्वस्त वल्लभ शेळके यांनी नमूद केले.

## मान्यवरांची उपस्थिती

कार्यक्रमास अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊली शेळके, सचिव विवेक शेळके, प्राचार्य डॉ. नवनाथ नरवडे, प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर, विभागप्रमुख प्रा. निर्मल कोठारी, प्रा. अमोल खतोडे, प्रा. अमोल भोर, डॉ. चौधरी, प्रा. निलेश नागरे, प्रा. शुभम शेळके आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सचिन पोखरकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागप्रमुख प्रा. स्नेहा शेगर यांनी मानले.

## विविध क्षेत्रांत उपयोग

बँकिंग, पुरवठा साखळी व्यवस्थापन, डिजिटल व्यवहार, स्मार्ट कॉन्ट्रॅक्ट्स आणि ई-गव्हर्नन्स या क्षेत्रांमध्ये ब्लॉकचेनचा प्रभावी वापर कसा होतो, याची माहितीही या कार्यशाळेत देण्यात आली. पारदर्शकता वाढवणे आणि फसवणूक टाळणे या दृष्टीने या तंत्रज्ञानाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

## भविष्यातील संधींचे दालन

ब्लॉकचेनची विकेंद्रीत रचना आणि प्रगत क्रिप्टोग्राफीमुळे माहितीचे संरक्षण अधिक मजबूत होते. त्यामुळे येत्या काळात विविध क्षेत्रांमध्ये या तंत्रज्ञानाची भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार असल्याचे मत प्राचार्य डॉ. नवनाथ नरवडे यांनी व्यक्त केले.

# कडूस शाळेत विद्यार्थ्यांना टिफिन किटचे वाटप

**सीएसआर उपक्रमातून शिक्षणाला बळ**



सुपा : प्रतिनिधी

**तालुक्यातील जि.प. प्राथमिक शाळा कडूस येथे हिंदुस्थान फीड्स कंपनी, श्रीरामपूर यांच्या कॉर्पोरेट सामाजिक बांधिलकी (सीएसआर) उपक्रमांतर्गत इयत्ता पहिली ते सातवीतील ६५ विद्यार्थ्यांना दर्जेदार टिफिन बॉक्स व टिफिन बॅगचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे शाळेत उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले.**

## मान्यवरांची उपस्थिती व मार्गदर्शन

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विविध कार्यकारी विकास सेवा संस्थेचे माजी चेअरमन शिवाजी दिवटे होते. यावेळी कंपनीचे सेल्स ऑफिसर विलास गायकवाड यांनी कंपनीच्या वाटचालीबाबत माहिती देताना सांगितले की, स्वर्गीय हंबीरराव माने यांनी १९८८ साली हिंदुस्थान फीड्स कंपनीची स्थापना केली. आज कंपनीच्या श्रीरामपूर, सातारा, बारामती तसेच राजस्थान येथे शाखा कार्यरत आहेत. सचिन माने व नितीन माने यांच्या नेतृत्वाखाली कंपनी विविध प्रकारचे पशुखाद्य उत्पादन करत असून रत्नराज, हिरा, इंद्रनील, कोहिनूर, माणिक, नवरत्न, स्टार्टर, ग्रोव्हर, हिप्पर व ॲडव्हान्स वात्सल्य या उत्पादनांचा दुध उत्पादन वाढीसाठी मोठा उपयोग होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

## मान्यवरांची उपस्थिती

यावेळी सरपंच मनोज मुंगसे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष योगेश रावडे, सामाजिक कार्यकर्ते संजय जाधव व मुख्याध्यापिका जयश्री काळे यांनी विद्यार्थ्यांच्या हितासाठी राबविण्यात येणाऱ्या अशा उपक्रमांचे कौतुक केले.

## आयोजनासाठी संस्थांचे योगदान

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी साई पशुखाद्य सुपा, भैरवनाथ डेअरी कडूस, जगन्नाथ मिल्क अँड मिल्क प्रोडक्ट चांभुर्डी, नाथकृपा डेअरी, शिवआदर्श डेअरी व प्रभात डेअरी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## मोठ्या संख्येने उपस्थिती

कार्यक्रमास हेमंत रणसिंग, राणीताई काळे, विजय नरवडे, पप्पू शेख, राहुल काळे, मच्छिंद्र नरवडे, भाऊसाहेब रावडे, संदीप दिवटे, संजय रावडे, ज्ञानदेव नरवडे, संतोष ठुबे यांच्यासह ग्रामस्थ, विद्यार्थी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शमशुद्दीन सय्यद यांनी केले. सूत्रसंचालन शिक्षक भाऊसाहेब गवळी यांनी केले तर आभार प्रदर्शन मधुकर मगर यांनी मानले.

# परिवर्तनाचा संदेश देणाऱ्या संतविचारांचे आचरण करा

**कवी नितीन चंदनशिवे यांचे आवाहन**

पारनेर : प्रतिनिधी

**येथील न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये ग्रंथालय व मराठी विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'साहित्यिक आपल्या भेटीला' हा अभिनव उपक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध कवी नितीन चंदनशिवे उपस्थित होते.**

आपल्या मनोगतात चंदनशिवे यांनी साहित्य आणि समाज यांचा परस्परसंबंध उलगडताना सांगितले की, प्रत्येकाने जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन 'माणूस' म्हणून स्वतःची ओळख निर्माण करणे गरजेचे आहे. कविता ही केवळ मनोरंजनासाठी नसून समाजात सकारात्मक बदल घडवण्याचे प्रभावी माध्यम आहे. गाडगेबाबा, तुकडोजी महाराज आणि संत तुकाराम यांच्या परिवर्तनवादी विचारांचे आचरण प्रत्येकाने आपल्या जीवनात करावे, असे आवाहन त्यांनी केले. ''नेहमी भारतीय म्हणून जगा'' हा महत्त्वपूर्ण संदेशही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.




## यशस्वी प्रवासाची कहाणी

कार्यक्रमात शुभम घुंगार्डे यांची 'लेफ्टनंट क्लासवन अधिकारी' पदावर निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना शुभम यांनी आपल्या यशाचा प्रवास विद्यार्थ्यांसमोर मांडला. स्वतः च्या निरीक्षणातून कमतरता ओळखून त्यावर सातत्याने काम केल्यास यश मिळते. आत्मविश्वास वृद्धिंगत करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

## साहित्याची आवड वाढवणारे उपक्रम

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर होते. त्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये साहित्याविषयीची ओढ वाढते. साहित्यिकांनी दिलेले विचार समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचणे आवश्यक असून त्यातूनच माणूस म्हणून जगण्याची जाणीव बळकट होते.

## कार्यक्रम उत्साहात


कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. हरेश शेळके यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. माया लहारे यांनी तर आभार प्रदर्शन ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ. भाऊसाहेब शेळके यांनी केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे, गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. दत्तात्रय घुंगार्डे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. रवींद्र देशमुख, तसेच डॉ. नंदकुमार उदार, डॉ. प्रवीण जाधव, ग्रंथालय कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. साहित्य आणि समाज यांची सांगड घालणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

# हरिनामाच्या गजराने पिंपरी जलसेन दुमदुमले !

**९४ वर्षांच्या परंपरेचा अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात सुरू**

पिंपरी जलसेन : प्रतिनिधी

**श्रीराम नवमी व श्री हनुमान जयंतीच्या पावन पर्वानिमित्त येथे आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताहास गुरुवारपासून भक्तीमय वातावरणात उत्साहात प्रारंभ झाला. तब्बल ९४ वर्षांची अखंड परंपरा लाभलेल्या या सप्ताहामुळे संपूर्ण गाव आध्यात्मिक रंगात न्हाऊन निघाले असून सर्वत्र हरिनामाचा गजर घुमत आहे.**



## नामांकित कीर्तनकारांची उपस्थिती

सप्ताहात ह.भ.प. परमेश्वर महाराज दंडवते, ह.भ.प. संभाजी महाराज दरोडे, ह.भ.प. धनंजय महाराज उदावंत, ह.भ.प. गंगाराम महाराज खोडदे, ह.भ.प. भगवानजी महाराज शास्त्री, ह.भ.प. बाळशीराम महाराज मिंडे, ह.भ.प. प्रेमानंदजी महाराज शास्त्री, ह.भ.प. डॉ. मोहिनीताई पाबळे, ह.भ.प. गणेशजी महाराज शेंडे, ह.भ.प. गणेश महाराज शिंदे, ह.भ.प. आबासाहेब महाराज गोडसे आदी नामांकित कीर्तनकार व प्रवचनकारांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच ह.भ.प. सुभाष महाराज मगर यांची संत एकनाथ कथामाला दररोज सायंकाळी आयोजित करण्यात येणार आहे.

## संत परंपरेचा जागर

या सप्ताहात संत परंपरेचा जागर करत संत एकनाथ कथामाला, हरिपाठ, काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण, प्रवचन व हरिकीर्तन असे विविध कार्यक्रम दिवसभर रंगणार आहेत. विशेषतः सायंकाळी होणारी संत एकनाथ कथामाला भाविकांसाठी प्रमुख आकर्षण ठरत असून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहणार आहेत.

## भक्ती, ज्ञान आणि संस्कारांचा संगम

भक्ती, ज्ञान आणि संस्कारांचा संगम ठरणाऱ्या या सोहळ्याचा अधिकाधिक भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. सप्ताहामुळे गावात एकात्मता व धार्मिक उत्साह अधिक दृढ होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

## महाप्रसाद व सामुदायिक उपक्रम

सप्ताहादरम्यान महाप्रसाद, सामुदायिक भोजन व विविध धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गावातील ग्रामस्थांसह मुंबई व पुणे येथील मंडळी मोठ्या उत्साहाने तयारीत सहभागी झाली असून संपूर्ण गावात सणासुदीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## लाईव्ह प्रक्षेपण

पिंपरी जलसेन येथील अखंड हरिनाम सप्ताहाचा लाभ अधिकाधिक भाविकांना घेता यावा यासाठी संपूर्ण सप्ताहाचे लाईव्ह प्रक्षेपण करण्यात येणार आहे. गावाबाहेरील तसेच परदेशात असलेल्या भाविकांनाही घरबसल्या कीर्तन, प्रवचन व संत एकनाथ कथामालेचा आनंद घेता येणार आहे. यामुळे या भक्तिमय सोहळ्याचा आध्यात्मिक लाभ अधिक व्यापक स्तरावर पोहोचणार असून भाविकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com